# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- २७/११/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २७.११.२०२२ | पुढारी पा. न. ०९ | घरफोडी करणा-या आरोपींना अटक | काशिमीरा | |
| २. | २७.११.२०२२ | पुढारी पा. न. ०९ | भाजपामध्ये गटबाजी जैसे थे | मिरा-भाईंदर | |
| ३. | २७.११.२०२२ | लोकमत पा. नं .०५ | हिंदी भाषा भवनविरोधात "मरीठी एकीकरण" आक्रमक | मिरा-भाईंदर | |
| ४. | २७.११.२०२२ | पुढारी पा. नं. १२ | गुणरत्न सदावर्तेंवर संभाजी ब्रिगेडकडून शाईफेक | इतर | |
| ५. | २७.११.२०२२ | सामना पा.नं .१३ | रामदेवबाबांच्या विरोधात वातावरण तापले | इतर | |
| ६. | २७.११.२०२२ | सामना पा.नं .१३ | राज्यपाल भगतसिंह कोश्यारींकडून २६/११ मधील शहीदांचा अवमान | इतर | |
| ७. | २७.११.२०२२ | सकाळ पु. पा. ०२ | पाच लाखांच्या ई सिगारेट जप्त | गुन्हे शाखा | |
| ८. | २७.११.२०२२ | सकाळ पु. पा. ०२ | राज्यपालांच्या निषेधार्थ मिरा-भाईंदरमध्ये निषेध | मिरा-भाईंदर | |
| ९. | २७.११.२०२२ | लोकमत पु. पा. ०३ | फोटो व्हायरल करण्याची धमकी | वालीव | |

पुढारी पा. नं. ९.

# घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक

## ८ लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीमध्ये घरात कोणी नसल्याच्या संधीचा फायदा घेत भरदुपारी घरफोडी करण्यात आली होती. त्या गुन्ह्याचा पोलिसांनी तपास करून उत्तरप्रदेश येथून तीन आरोपींना अटक केली आहे. आरोपीकडून चोरी गेलेल्यापैकी ८ लाख ६८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

काशिमिरा येथील न्यू गणेशकृपा सोसायटी, अमर पॅलेस येथे राहणारे प्रविण दिगंबर शेटये हे त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी हॉल बघण्यासाठी ५ नोव्हेंबर २०२२ रोजी गेले असता दुपारच्या सुमारास त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरातील लोखंडी कपाटातील ७ लाख ३५ हजारांचे सोन्याचे दागिने व २ लाख रुपये रोख रक्कम असा एकूण ९ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल अज्ञातांनी चोरून नेला. त्याबाबत काशीमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि प्रशांत गांगुर्डे व त्यांचे पथकाने तपास सुरू केला. तपास करत असताना आरोपी हे गुन्हा करण्यासाठी गाझीयाबाद व दिल्ली या ठिकाणाहून येवुन गुन्हा केला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ यांचे परवानगीने काशिमिरा पोलीस ठाण्याचे पथक गाजियाबाद याठिकाणी जावून आरोपी हबीब हाफिज सैफी हा राहत असलेल्या परिसरात २ दिवस वेशभुषा बदलून सापळा रचुन त्याला १२ नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आले. पोलीस कोठडी दरम्यान आरोपीने या गुन्ह्यात त्याचे साथीदार रमेश ऊर्फ कालू बैसाखीराम राजपूत व अकबर सुलतान सैफी यांची माहिती दिली. आरोपी रमेश ऊर्फ कालु वैसाखीराम राजपुत यास शाहदरा, नवी दिल्ली परिसरात ४ दिवस सापळा रचून अटक केली.

पुढारी ५.१२.१९.

# भाजपमध्ये गटबाजी जैसे थे

## नरेंद्र मेहता यांचा मेळावा अनधिकृत : रवी व्यास

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर भाजपमधील गटबाजी काही केल्या संपुष्टात येत नसल्याचा प्रत्यय कार्यकर्ता मेळाव्याच्या आयोजनावरून पुन्हा आला आहे. माजी आ. नरेंद्र मेहता यांनी गतवर्षीप्रमाणे येत्या २७ डिसेंबर रोजी मीरारोडच्या सेव्हन इलेव्हन शाळेच्या पटांगणात कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले आहे. मात्र, वरिष्ठांच्या आदेशानुसार कोणत्याही कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले नसल्याचा व्हिडीओ जिल्हाध्यक्ष अॅड. रवी व्यास यांनी सोशल मीडियावर व्हायरल करीत आपल्या समर्थकांना त्यात उपस्थित न राहण्याचे आवाहन केले आहे. यावरून भाजपमधील गटबाजी जैसे थे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मिरा-भाईंदरमध्ये २०१५ पासून फूट पडून यावेळी माजी आ. नरेंद्र मेहता विरुद्ध आ. गीता जैन यांच्या गटाची निर्मिती झाली. पालिकेत २०१५ पासून भाजपची सेनेसोबत सत्ता स्थापन झाल्यानंतर २०१७ मधील निवडणुकीत भाजपने पालिकेत एकहाती सत्ता स्थापन केली. याचे श्रेय तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन राज्यमंत्री रवींद्र चव्हाण व तत्कालीन आ. मेहता यांना जाते. पालिकेत भाजपच्या एकहाती सत्ता स्थापनेनंतर मेहता यांची एकाधिकारशाही सुरु झाल्याचा आरोप करीत त्यावर नाराज झालेल्या सुमारे १२ नगरसेवकांनी आपली वेगळी चूल मांडली. त्यात विद्यमान जिल्हाध्यक्ष व्यास यांचा समावेश आहे. यावेळी भाजपमध्ये माजी आ. मेहता, आ. गीता जैन व मेहता विरोधक नगरसेवक असे तीन गट निर्माण झाले.

### अधिकृत मेळावा नसल्याचा व्हिडीओ व्हायरल

नरेंद्र मेहता यांनी गतवर्षीप्रमाणे यंदाही येत्या २७ नोव्हेंबर रोजी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केल्याने जिल्हाध्यक्ष व्यास यांनी हा मेळावा वरिष्ठांच्या आदेशानुसार आयोजित केला नाही. त्यामुळे तो भाजपचा अधिकृत मेळावा नसल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करून आपल्या समर्थकांना या मेळाव्याला उपस्थित न राहण्यांचे आवाहन केले आहे. यावरून भाजपमधील गटबाजी जैसे थे असल्याचेच स्पष्ट झाले आहे.



भाजपमधील या गटबाजीमुळे पक्षाची प्रतिमा मलिन होत असतानाच पक्षाचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मेहता विरोधक नगरसेवकांमधील व्यास यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली. यामुळे नाराज झालेल्या मेहता गटातील नगरसेवकांनी थेट प्रदेश कार्यालय गाठून वेगळा गट स्थापन करण्याचा इशारा दिला. त्यांची समजूत काढून वरीष्ठांनी त्यावर चर्चा करून निर्णय जाहीर करण्याचे आश्वासन मेहता गटाला दिले. त्याला मान्य करीत मेहता गटाचे पक्ष कार्य सुरु असतानाच मेहता यांची प्रदेश सचिव पदावर नियुक्ती करून त्यांच्या गटाला वरिष्ठांकडून धक्का देण्यात आला.

मेहता गटाने व्यास यांच्या जिल्हाध्यक्षपदावरील नियुक्तीला विरोध करून मेहता यांच्या नियुक्तीची मागणी केली होती. यावर वरिष्ठांनी मेहता गटाची बोळवण केल्यानंतर मेहता विरोधात आ. जैन व व्यास यांचा गट एकत्र झाला. त्यांनी एकत्रिपणे मेहता यांना शह देण्याचा प्रयत्न सुरू केला असता मेहता यांनी देखील आपले शक्तिप्रदर्शन करण्यास सुरुवात केली. त्यांनी गतवर्षी आपल्या सेव्हन इलेव्हन शाळेच्या पटांगणात कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले. त्याला मेहता विरोधी गटाने विरोध करीत मेहतांवर जोरदार टीका केली. त्यावर पलटवार करीत मेहता यांनी आपले शक्तिप्रदर्शन करून विरोधी गटावर सडकून टीका केली. यानंतर विद्यमान मंत्री रविंद्र चव्हाण व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मेहता व त्यांच्या विरोधी गटात समझोता घडवून आणला. यावरून भाजपमधील गटबाजी संपुष्टात आल्याचा निष्कर्ष लावला गेला.

लोकमत पा.नं.५.

# हिंदी भाषा भवनाविरोधात 'मराठी एकीकरण' आक्रमक

## समाजात तेढ निर्माण करणारे भवन होऊ न देण्याचा इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** आमदार प्रताप सरनाईक यांच्या मागणीवरून मीरा भाईंदर महापालिकेने मीरा रोडच्या हाटकेश भागात सुविधा भूखंडावर हिंदी भाषा भवनचे भूमिपूजन रविवारी आयोजित केले असून त्याला मराठी एकीकरण समितीने विरोध करीत आंदोलन केले. मराठी राजभाषा असून 'मराठी भाषा भवन' हवे असताना हिंदी भाषिकांच्या मतांसाठी व समाजात तेढ निर्माण करण्यासाठी हे भवन महाराष्ट्रात होऊ देणार नाही, असा इशारा समितीने दिला आहे.

ओवळा माजिवडा मतदारसंघाचे आमदार सरनाईक यांनी मीरा भाईंदरमध्ये विकासकांकडून उपलब्ध होणाऱ्या नागरी सुविधा भूखंड तसेच शासकीय जमिनीवर विविध भाषिक तसेच समाजांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या इमारतींचे भूमिपूजन सुरू केले आहे. नरवीर तानाजी मालुसरे मराठा भवन, वारकरी भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची भूमिपूजने अलीकडेच करण्यात आली. रविवार २७ नोव्हेंबर रोजी हरिवंशराय बच्चन हिंदी भाषा भवनाचे भूमिपूजन होणार आहे. भूमिपूजनसाठी उत्तर प्रदेश सरकारचे मंत्री स्वतंत्र देव सिंह, ठाण्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई, अभिनेते जितेंद्र कपूर आदींसह उत्तर भारतीय समाजातील नेते उपस्थित राहणार आहेत. यावेळी हिंदी भाषिक कार्यक्रमांचे आयोजन भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृहात होणार आहे.




हिंदी भाषा भवनच्या अंतर्गत सजावटीसाठी राज्य सरकारकडून एक कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. भवनाची इमारत 'कन्स्ट्रक्शन टीडीआर'च्या माध्यमातून उभी राहणार आहे. हिंदी भाषिकांची शहरात मोठी संख्या असल्याने हे भवन उभे राहत आहे. येथे हिंदी साहित्यविषयक कार्यक्रम होतील. हिंदी पुस्तके, कवी संमेलने, परिसंवाद, व्याख्यानमाला, नाटके असे कार्यक्रम होऊ शकतात. चांगल्या कामात कोणीही विनाकारण प्रसिद्धीसाठी राजकारण करू नये, असे आमदार प्रताप सरनाईक म्हणाले.

दरम्यान, हिंदी भाषा भवनला मराठी एकीकरण समितीने विरोध केला आहे. समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख, प्रदीप सामंत यांनी भवनावर टीका केली. समितीच्या वतीने शनिवारी सायंकाळी भाईंदर रेल्वे स्थानकाबाहेर स्वाक्षरी मोहीम राबवली. काशीमीरा नाका येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ उपोषण सुरू केले. पालिका आणि पोलिसांनी तेथून त्यांना हटवले.

पुढारी पा.नं.१२.

# गुणरत्न सदावर्तेंवर संभाजी ब्रिगेडकडून शाईफेक

## महाविकास आघाडीच्या समर्थकांकडून हे कृत्य ▮ सदावर्तेंचा आरोप



### संजय राऊत, सुषमा अंधारे यांची नक्षली भाषा

शिवसेना नेते संजय राऊत हे नेहमी रक्तपाताची भाषा करतात. सुषमा अंधारे यांचे वक्तव्य त्याच दिशेने जाणारे आहे. मागील दोन आठवड्यापूर्वी आपणास नक्षलवाद्यांच्या नावाने पत्र आले आहे. राऊत व अंधारे यांची भाषा, वक्तव्य 'त्या' पत्राशी जुळणारे आहे, त्यामुळे या बाबींचा 'त्या' दिशेने तपास करण्यात यावा, अशी मागणी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी केली.

▮ **सोलापूर :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती प्रश्नावर ॲड. गुणरत्न सदावर्ते हे शनिवार, २६ नोव्हेंबर रोजी सोलापुरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये पत्रपरिषद घेत होते. त्यावेळी ॲड. सदावर्ते यांच्यामागे थांबलेल्या संभाजी ब्रिगेडच्या काही कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शाईफेक केली. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या सदावर्तेंचा निषेध असो, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

अचानक उद्भवलेल्या या प्रकाराने एकच गोंधळ उडाला होता. सोमनाथ राऊत व शत्रु माने असे शाईफेक करणाऱ्या कार्यकर्त्यांची नावे असल्याचे समजते. दरम्यान, पोलिसांनी 'त्या' कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी शाईफेक झाल्याच्या प्रकाराबद्दल प्रसार माध्यमांशी बोलताना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेनेचे संजय राऊत, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असा उल्लेख करत या प्रकारामागे त्यांच्या समर्थकांचे हे कृत्य आहे. आम्ही छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या विचाराचे वारसदार व मावळे असून, अशांना अजिबात घाबरणार नाही. अशा घटनांमुळे मला काहीच फरक पडणार नाही. माझा आवाज कोणीही दाबू शकणार नाही. दरम्यान, एस.टी. कर्मचाऱ्यांच्या वतीने आयोजित केलेल्या सत्कार कार्यक्रमासाठी ते पुढे निघून गेले.

सामना पा.नं.३०

# रामदेवबाबांच्या विरोधात वातावरण तापले

## योग परंपरेला लांच्छन आणणारे वक्तव्य : डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी) – रामदेवबाबा यांनी महिलांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून महिला वर्गात प्रचंड संताप निर्माण झाला आहे. योग परंपरेला लांच्छन आणणारे रामदेवबाबांचे वक्तव्य होते, अशा शब्दांत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी निषेध केला तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिलांनी रामदेवबाबांच्या फोटोला जोड्याने हाणले.

महिलांनी कपडे घातले नाहीत तरी त्या जास्त सुंदर दिसतात असे वादग्रस्त वक्तव्य रामदेवबाबा यांनी शुक्रवारी ठाण्यात केले होते. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रामदेवबाबांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.

योगासारख्या हिंदुस्थानी परंपरेतील श्रेष्ठ बाबीसोबत रामदेवबाबांचे नाव लावणे आता त्यांच्या या विधानाने लांच्छनास्पद होईल. रावणाच्या स्त्रीच्या अपहरण करण्याच्या रावणाच्या मानसिकतेचे हे आणखी एक रूप असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले आहे. योगासारख्या माध्यमातून संयम, स्वाध्य अशा गोष्टी समाजाला सांगितल्या असताना स्वत: मात्र महिलांबाबत असा दूषित दृष्टिकोन ठेवणे अत्यंत चुकीचे आहे. रामदेवबाबा यांनी महिलांविषयी केलेल्या विकृत मानसिकता दाखवणारे असल्याचे निलम गोऱ्हे यांनी म्हटले आहे.

### अमृता फडणवीसांनी निषेध करायला हवा

*मात्र आपल्या देशात स्वत:ला गुरू म्हणवणाऱ्या अशा अनेक पुरुषांची जीभ घसरणे लाजीरवाणे आहे. यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि इतर स्त्रिया तिथे उपस्थित होत्या. पण याबाबत त्यांनीही यावर निषेध म्हणून बोलायला हवे होते, असे डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या.*



**राष्ट्रवादी काँग्रेसचे जोडे मारो आंदोलन**
मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रामदेवबाबांच्या वक्तव्याच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. पक्षाचे मुंबई कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, कार्याध्यक्षा राखी जाधव यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले.

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारीकडून २६/११ मधील शहीदांचा अवमान

## चप्पल घालून पुष्पचक्र अर्पण केले

## राष्ट्रीय युद्ध स्मारकावरही हीच कृती

मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी) – छत्रपती शिवरायांचा अवमान करणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज शहीदांचा जाहीररीत्या अवमान केला आहे. राज्यपालांनी पायात चपला घालून शहीद स्मारकाला पुष्पचक्र वाहिले. या कृतीवरून त्यांच्यावर टीकेची झोड उठली, पण शहीद स्मारकावर अभिवादन करण्यासाठी चप्पल-जोडे काढण्याची आवश्यक्ता नाही, असे उलट स्पष्टीकरण राजभवन कार्यालयाने माध्यमांना पाठवून शहीदांच्या अवमानात भरच घातली आहे.

मुंबईवर २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज चौदा वर्षे पूर्ण झाली. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय परिसरातील पोलीस हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र वाहण्यासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी सकाळी आले होते. भगतसिंह कोश्यारी यांनी पायातील चप्पल न काढताच शहीद स्मारकाला पुष्पचक्र वाहिले. राज्यपालांनी पुष्पचक्र वाहिल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही पुष्पचक्र वाहिले. पण या तिघांनीही चपला काढून शहीद स्मारकावर पुष्पचक्र वाहिले. चप्पल घालून शहीद स्मारकावर पुष्पचक्र वाहिल्यानंतर भगतसिंह कोश्यारी यांच्यावर चारही बाजूने टीका होताच राजभवन कार्यालयाने यावर स्पष्टीकरण दिले आहे.



### राजभवनाने काय म्हटलेय?

*हुतात्मा पोलीस अधिकारी व जवानांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यासाठी राज्यपाल आले असताना एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने या ठिकाणी चप्पल-जोडे काढण्याची आवश्यकता नाही, असे सांगितले. अलीकडेच राज्यपालांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट दिली होती. त्या ठिकाणी हीच पद्धत पाळली होती. त्यामुळे राज्यपालांनी हुतात्म्यांचा अवमान केला, असे म्हणणे अतिशय द्वेषपूर्ण व खोडसाळपणाचे आहे. या कार्यक्रमात मुख्य सचिव व अधिकाऱ्यांनीही पादत्राणे घालून अभिवादन केले, असे राजभवनाच्या पत्रकात म्हटले आहे.*

सकाळ ५.५१.२०

## पाच लाखांच्या ई सिगारेट जप्त

भाईंदर, ता. २५ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने बंदी असलेल्या ईलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्रेत्यांवर छापा टाकून पाच लाखांहून अधिक किमतीच्या ई सिगरेटचा साठा जप्त केला आहे.

गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी ई सिगारेट विक्री करणाऱ्यांचा शोध घेवून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. सहाय्यक पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक राहुल राख, सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन बेन्द्रे, हवालदार मनोहर तावरे, सुनील कुडवे, राजविरसिंग संधु, प्रवीणराज पवार यांनी ही कारवाई केली.

## राज्यपालांच्या निषेधार्थ मिरा-भाईंदरमध्ये निषेध

### कोश्यारींना तातडीने हटवण्याची मागणी

भाईंदर, ता. २६ (बातमीदार) : राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा मिरा-भाईंदर काँग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आला. माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी उपमहापौर सय्यद नूरजहाँ हुसैन यांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी यावेळी काशी मिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर निषेध आंदोलन केले. राज्यपालांनी महापुरुषाचा अपमान करून शिवप्रेमी नागरिकांसह महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे त्यांना तातडीने हटवण्यात यावे, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

संवैधानिक पद भूषवणाऱ्या महाराष्ट्राच्या राज्यपालांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासूनच सतत समाजसुधारक, महापुरुषांवर वादग्रस्त, आक्षेपार्ह विधाने करीत असल्याने त्यांना केंद्र सरकारने त्वरित पदमुक्त करावे, अशी मागणी जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांनी केली. यावेळी माजी नगरसेवक अनिल सावंत, फरीद कुरेशी, रुबिना शेख, प्रदेश प्रतिनिधी प्रकाश नागणे, राकेश राजपुरोहित, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव दीप काकडे, युवक अध्यक्ष सिद्धेश राणे आदी उपस्थित होते.

लोकमत ५.५१.२०

## फोटो व्हायरल करण्याची धमकी

नालासोपारा : वसईतील तरुणीचे अश्लील फोटो ओळखीच्या आरोपीने व्हायरल करण्याची धमकी देत तिच्याकडे पैशाची मागणी केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपीविरोधात वालीव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावराईपाडा येथे राहणाऱ्या २४ वर्षीय तरुणीला २३ नोव्हेंबरपासून ओळखीच्या आरोपी तरुणाने व्हाट्सअप व फोनवर मेसेज करून ५० हजारांची पैशाची मागणी केली होती. तरुणीचे अश्लील फोटो नातेवाइकांना पाठवून तिला धमकी दिली जात होती. तसेच तरुणीच्या भावाच्या मोबाइलवर तिचे अश्लील फोटो पाठवून तिचा विनयभंग केला होता. तरुणीच्या तक्रारीवरून शुक्रवारी पोलिसांनी गुन्हा नोंदवला.